सत्यमेव जयते

# विधानसभा विनंती अर्ज समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी विधानसभा)**

**" नवीन शेवा (ता.उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरिता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत "**
**या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानसभा विनंती अर्ज समितीचा**

# अंतरिम अहवाल

( दिनांक ऑगस्ट, २०१६ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला )

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१६

# विधानसभा विनंती अर्ज समिती

**(२०१५-२०१६)**

(तेरावी विधानसभा)

**“ नवीन शेवा (ता.उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरिता**
**जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही**
**प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत ”**
**या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांच्या**
**विनंती अर्जावरील विधानसभा विनंती अर्ज समितीचा**

## अंतरिम अहवाल

एचबी १०५३–१

## विधानसभा विनंती अर्ज समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

**(१) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स. तथा " कार्यकारी समिती प्रमुख "**

**सदस्य :**

(२) श्री. किर्तीकुमार (बंटी) भांगडिया, वि.स.स.

(३) श्री. संजीवरेड्डी बोधकुरवार, वि.स.स.

(४) श्री. उदेसिंग पाडवी, वि.स.स.

(५) श्री. योगेश टिळेकर, वि.स.स.

(६) श्री. उल्हास पाटील, वि.स.स.

(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(८) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(९) श्री. प्रदीप जाधव-नाईक, वि.स.स.

(१०) श्रीमती सुमनताई पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव,

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती),

(४) श्री. सुरेश मोगल, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना . . . . . . | (सात) |
| २. | अंतरिम अहवाल . . . . . | १ |
| ३. | अभिप्राय व शिफारशी . . . . . | ८ |
| | **परिशिष्टे** | |
| ४. | परिशिष्ट-एक (श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचा विनंती अर्ज) . . | १३ |
| ५. | परिशिष्ट-दोन (विभागाकडून प्राप्त झालेली माहिती) . . . . | १९ |
| ६. | परिशिष्ट-तीन (बैठकींचा संक्षिप्त वृत्तांत) . . . . . | ५७ |

**प्रस्तावना**

मी विधानसभा विनंती अर्ज समितीप्रमुख समितीच्या वतीने **“ नवीन शेवा (ता. उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरिता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत ”** या विषयावरील अंतरिम अहवाल सादर करीत आहे.

**“ नविन शेवा (ता. उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरीता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत ”** या विषयावरील श्री. जनार्दन पांडुरंग म्हात्रे व इतर ग्रामस्थांच्या सह्या असलेला विनंती अर्ज मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी **श्री. मनोहर भोईर वि.स.स.** यांनी विधानसभेस सादर केला. सदरचा विनंती अर्ज त्याच दिवशी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द केला. **(परिशिष्ट-एक पहावे)**

उपरोक्त विनंती अर्जाबाबतची वस्तुस्थिती नगरविकास विभागाकडून मागविण्यात आली व विभागाकडून त्यानुसार माहिती प्राप्त झाली **(परिशिष्ट-दोन).** या विनंती अर्जासंबंधात समितीने **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.** मूळ विनंती अर्जदार व श्री. जनार्दन पांडुरंग म्हात्रे व इतर ग्रामस्थ, नगरविकास विभागीय सचिव, विभागीय सचिव, व्यवस्थापकीय संचालक (सिडको), अध्यक्ष, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) तसेच जिल्हाधिकारी (जि. रायगड) यांची बुधवार, दिनांक २० जानेवारी, २०१६, बुधवार, दिनांक ११ मे, २०१६ व मंगळवार, दिनांक २४ मे, २०१६ रोजी साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त विनंती अर्जासंदर्भात मूळ विनंती अर्जदारांनी साक्षीच्या वेळी दिलेली माहिती आणि विभागाने कळविलेली लेखी माहिती तसेच विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी दिलेली अधिक माहिती यांचा साकल्याने विचार करून अंतरिम अहवाल तयार केला असून तो समितीच्या बुधवार दिनांक २७ जुलै, २०१६ रोजीच्या बैठकीत संमत करण्यात आला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ जुलै, २०१६.

**डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.**
कार्यकारी समिती प्रमुख,
विधानसभा विनंती अर्ज समिती.

## अंतरिम अहवाल

**" नविन शेवा (ता. उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरीता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत "**

**१.१ " नविन शेवा (ता. उरण, जि. रायगड) या गावाच्या पुनर्वसनाकरीता जेएनपीटीने शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नसल्याबाबत "** या विषयावरील ग्रामस्थांचा विनंती अर्ज **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.** यांनी **मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१५** रोजी विधानसभेस सादर केला. सदरचा विनंती अर्ज मा. अध्यक्षांनी त्याच दिवशी विधानसभा विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द केला.

विनंती अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, उरण जि. रायगड येथे जवाहरलाल नेहरू बंदरासाठी नविन शेवा व कोळीवाडा या गावांचे पुनर्वसन १९८७ साली झाले असून नविन शेवा या गावासाठी ३३.६४ हेक्टर जमीन कायद्यानुसार मंजूर करण्यात आलेली होती. त्याची संपूर्ण रक्कम जवाहरलाल नेहरू बंदर यांनी सन १९८३ ते १९८५ दरम्यान जिल्हाधिकारी रायगड यांना टप्याटप्याने अदा केली आहे. तथापि, नविन शेवा या गावाचे पुनर्वसन फक्त १०.४७ हेक्टर एवढ्याच जागेवर केले आहे. उर्वरित जमिनीचे संपूर्ण पैसे भरलेले असतांनाही अद्याप शिल्लक जमीन उपलब्ध करून दिलेली नाही. तसेच त्यावेळेस शासनाने प्रत्येक कुटूंबातील प्रौढ व्यक्तीच्या नावे १.५ (दिड) गुंठे जमीन देण्याचे नमूद केल्याप्रमाणे अद्यापही दिली गेली नाही. सदर गावांना शासनाच्या अतंर्गत वादापोटी वाढीव गावठाण सुद्धा देण्यात आलेले नाही. तसेच हनुमान कोळीवाडा या गावाला वाळवीचा प्रादुर्भाव झाल्याने या गावाचे फेरपुनर्वसन करणे गरजेचे आहे.

उपरोक्त विनंती अर्जासंदर्भात नगरविकास विभाग, सिडको, महसूल व वन विभाग आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांच्याकडून यासंदर्भात माहिती मागविली असता जिल्हाधिकारी रायगड यांनी कळविलेल्या वस्तुस्थितीनुसार जवाहरलाल नेहरू पतन न्यासासाठी ११७२ हे.आर. ऐवढे खाजगी क्षेत्र भूसंपादन केल्यामुळे उरण तालुक्यातील शेवा हे गाव बाधीत झाले होते. बाधीत झालेल्या शेवा गावातील मूळ गावठाणातील लोकांचे बोकडवीरा ता. उरण तर गावठाणा लगत असलेल्या कोळीवाडा गावाचे पुनर्वसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) ता.उरण या ठिकाणी करण्यात आले.

जवाहरलाल नेहरु पतन न्यासासाठी सन १९८० ते १९८५ च्या दरम्यान भुसंपादन कार्यवाही पुर्ण केल्यानंतर त्यास महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९७६ हा लागू केलेला नाही. तत्कालीन पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ मे १९८६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शेवा गावाच्या पुनर्वसनाबाबत अनुसरावयाच्या धोरणाबाबत निर्देश देण्यात आले. या निर्देशानुसार मूळ गावठाणामध्ये जेवढी जागा घराच्या बांधकामासाठी होती, तेवढी जागा अथवा कमीत कमी ४० चौ.मी. एवढी जागा (यापैकी जादा असेल ते) देण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच बाधीत कुटूंबातील प्रौढ व्यक्तींने मागणी केल्यास दीड गुंठे अतिरिक्त क्षेत्र देणेबाबत निश्चित करण्यात आले. या धोरणाच्या अनुषंगाने विशेष भूसंपादन अधिकारी यांनी १५-७५-५ हे. आर. एवढे क्षेत्र संपादीत करून (संपादनाचे अभिलेख दप्तरी उपलब्ध नाहीत). संपादीत क्षेत्र



१९८६ साली सिडकोच्या ताब्यात देण्यात आले. बाधीत कुटूंबाना भूखंडाचे वाटप करण्यासाठी उप विभागीय अधिकारी पनवेल यांनी एकूण १५-७५-५ हे. आर क्षेत्रापैकी सर्व क्षेत्र गावठाणासाठी वर्ग करून त्यापैकी ४-९७-१ हे. आर एवढ्या क्षेत्राचे २३७ कुटूंबाना भुखंडासाठी वाटप करण्यात आले तर ५-५१-४९ हे.आर. एवढ्या क्षेत्रावर नागरी सुविधा देण्यात आल्या आणि अजुनही ०५-२७-० हे.आर. एवढे क्षेत्र शिल्लक आहे.

मूळ शेवा गावठाण (बोकडवीरा) व कोळीवाडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबाच्या संख्येमध्ये सद्यस्थितीत वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत या परिसरातील बहूसंख्य जागा शहर व औद्योगिक विकास महामंडळ व जवाहरलाल नेहरू पतन न्यासासाठी संपादित झालेली आहे. मूळ शेवा गावठाण व हनुमान कोळीवाडा येथील बाधीत कुटूंबाना महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९७६ प्रमाणे भूखंडाचे वाटप २६७ कुटूंबांना करावयाचे असल्यास या कायद्याच्या कलम ११ अन्वये राज्यशासनाने कायद्याच्या तरतुदी या प्रकल्पाला लागू करणे आवश्यक आहे. तसेच याबाबत जवाहरलाल नेहरू पतन न्यास, सिडको यांनी पुनर्वसनासाठी आवश्यक असणारी जमीन व नागरी सुविधा व आवश्यक निधी देणेबाबत त्यांना शासन स्तरावरून निर्देश देणे आवश्यक आहे.

१.२ **जिल्हाधिकारी रायगड यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार समितीने सभागृहाला विनंती अर्ज सादर करणारे सदस्य श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांची आणि नगरविकास विभागाच्या सचिवांची बुधवार, दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी साक्षी घेतली.** साक्षीच्या वेळी विनंती अर्जदार श्री. मनोहर भोईर वि.स.स. यांनी समितीस अशी माहिती दिली की, ता. उरण, जि. रायगड येथे जेएनपीटी बंदरासाठी नविन शेवा व कोळीवाडा या दोन्ही गावांचे पुनर्वसन केल्यानंतर त्यांना जोत्याखालची जमीन दिली. पुनर्वसन कायदा किंवा एमआरटीपी ॲक्ट, १९७६ प्रमाणे ३५० स्क्वेअर मीटर जमीन प्रत्येक कुटुंबाला आणि कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला दीड गुंठे जागा देणे आवश्यक असतानाही देण्यात आली नाही. फक्त जोत्याखालची जागा दिली. ग्रामस्थांनी ती जागा घेऊन आता त्याला ३० वर्षे झाली आहेत. आता रहिवाशांना जागा कमी पडू लागली आहे. जेएनपीटी व कलेक्टर यांचेकडे अनेक निदर्शने, उपोषणे व मोर्चे झाले. परंतु, प्रकल्पग्रस्तांना काही न्याय मिळाला नाही. आमदार झाल्यानंतर विधानसभेत या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री महोदयांसमवेत तसेच, नगर विकास विभागासमवेत देखील पत्रव्यवहार केला. परंतु, त्यालाही एक वर्ष होऊन गेले आहे. या संदर्भात विधानसभेत मी विनंती अर्ज मांडल्यानंतर आता तो विनंती अर्ज समितीसमोर आलेला आहे. आमचे म्हणणे असे आहे की, शिल्लक जागेपैकी प्रथम दीड गुंठे जागा प्रत्येक कुटुंबाला तातडीने द्यावी. सिडको व जेएनपीटीचा काही वाद असेल तर त्यांनी तो परस्पर सोडवावा. परंतु, प्रकल्पग्रस्त पुनर्वसीत लोकांना भूखंड मिळाला पाहिजे. या विषयावर लक्षवेधी सूचना देखील दाखल केलेली होती. त्यावर माननीय राज्यमंत्री, नगरविकास, डॉ. रणजित पाटिल यांनी असे उत्तर दिलेले आहे की, शासन यासंबंधी सकारात्मक आहे. या प्रकरणी आणखी जमिनीची मागणी असल्यास ती देण्याची शासनाची भूमिका सकारात्मक आहे. याचा अर्थ शासनाची भुमिका योग्य आहे. मात्र यामध्ये जेएनपीटी व सिडको असे शासनाचे दोन विभाग आहेत. जमीन कोणी द्यावयाचे हे ठरवावयाचे आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी विषद करताना सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी समितीस असे विषद केले की, सिडकोचा एरिया अंदाजे ३०० स्क्वेअर कि.मी.चा आहे. शासनाने ती जमीन संपादित करून सिडकोच्या ताब्यात दिली. आमदार महोदयांनी मांडलेला प्रश्न बोकडवीरा गावाचा आहे. या सर्व्हे नंबर ११२ चा ८६ हेक्टर एरिया आहे. ही जमीन सिडकोला १९८५ मध्ये ॲडव्हान्समध्ये देण्यात आली. त्यानंतर त्यांची जमीन संपादनाची कार्यवाही झाली व ही जमीन सिडकोच्या ताब्यात देण्यात आली. सिडकोने आजुबाजुची सर्व जमीन विकसित केलेली आहे. प्रकल्पग्रस्तांना जे साडेबारा टक्के द्यायचे असतात ते देखील सिडकोने जवळपास ५० ते ६० टक्के दिलेले आहेत. बाकीचे देण्याची प्रोसेस सुरू आहे. या जमिनी जवळची सर्व जमीन विकसित झालेली आहे. जमिनीची किंमत वाढून ती आता प्रती हेक्टरी जवळपास १०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचलेली आहे. ज्यावेळेस जेएनपीटी आले त्यावेळेस त्यांच्याकरिता स्वतंत्ररित्या जमीन संपादित करण्यात आली व तिचा ताबा जेएनपीटीकडे देण्यात आला. त्या जमिनीबद्दलचा साडेबारा टक्क्यांचा सेपरेटली प्रश्न सुरू असून तो ते सोडवित आहेत. जेएनपीटीला जी जमीन देण्यात आली त्या भागामध्ये हे गाव होते. त्या गावातील लोकांना बाहेर शिफ्ट करायचे होते, त्यासाठी सिडकोची ही जमीन घेण्यात आली. याबाबत एसडीओंनी त्यांच्या ऑर्डरमध्ये असे नमूद केले आहे की, आम्ही यामध्ये १५.७५ हेक्टर मार्क करीत आहोत. त्यापैकी त्यांनी सिडकोच्या जमिनीचा १०.४८ हेक्टरचा फायनल ले आऊट तयार केला. त्यावेळेस मदत व पुनर्वसन मंत्री व सचिवांची बैठक झाली आणि त्यांनी एक निर्णय घेतला. त्यावेळी जो रिहॅबिलीटेशनचा कायदा होता तो फक्त इरिगेशनसाठी होता. मात्र हा इरिगेशनचा प्रोजेक्ट नव्हता, तरी त्या बैठकीत असा निर्णय झाला की, ज्यांचे ज्या साईजचे घर आहे, त्या घराची रिप्लेसमेंट तेथे देण्यात येईल व मिनिमम ४० स्क्वेअर मीटर जागा देण्यात येईल. त्याप्रमाणे त्यांनी १०.४८ हेक्टरचे ले आऊट तयार केले. त्यामध्ये २८७ व्यक्तिंना बसवून त्यांना प्लॉट देण्यात आले. ही तेव्हाची स्थिती होती. स्थानिक लोकांची अशी मागणी आहे की, त्यांना पूर्ण जमीन देण्यात आली नाही. आता रिहॅबिटिलेशन कायदा, १९९९ नुसार जमीन देण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. त्यांची दुसरी मागणी अशी आहे की, बोकडवीरा गावाने सिडकोला जी जमीन पहिल्यांदा ॲडव्हान्समध्ये दिली त्याचे कारण असे होते की, या प्रोजेक्टसाठी ही जमीन वापरण्यात येईल. परंतु, ती अगोदर पासून सिडकोकडे आहे, सिडकोने त्याच्या आजूबाजूला डेव्हलपमेंट केलेली आहे. जेएनपीटीचे असे म्हणणे आहे की, ही जी १५.७५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली, त्यासाठीचे पैसे त्यांनी लँड ॲक्विजीशन अधिकाऱ्यांकडे दिले होते, तसेच डेव्हलपमेंटसाठीसुद्धा काही पैसे दिलेले आहेत. याबाबत खूप बैठका झालेल्या आहेत. त्यांच्याकडे त्याचा पुरावा आहे. त्यांनी लेटर दिले आहे की, तुम्ही चेक घ्या. परंतु, कलेक्टर, डिव्हीजनल कमिशनर व रेव्हेन्युकडे मनी रिसिटचा उल्लेख नाही. परंतु, पैसे त्यांनी दिले की नाही हा एक वेगळा विषय आहे. त्यांच्याकडे एक पत्र आहे की, त्यांनी ऑफर केली होती की, आम्ही याचे पैसे देत आहोत.

या गावातील लोकांची जी मागणी आहे तो बेसिकली जेएनपीटीचा प्रश्न आहे. बाकी गावांसाठी आम्ही आमची व्यवस्था करीत आहोत. आमच्या समोर असा प्रश्न आहे की, या जमिनीचे पैसे जर त्यांनी दिलेले असतील तर, त्याचे लँड एनहान्समेंटचे पैसे जे नंतर येतात आणि साडेबारा टक्क्यांचे पैसे आम्ही दिलेले आहेत. प्लस तेथे सगळीकडे डेव्हलपमेंट केलेली आहे. अगोदर कमी असलेल्या त्या जमिनीची किंमत आता १०० कोटी रुपये प्रती हेक्टर एवढी झालेली आहे. हा प्रश्न याप्रमाणे सोडवायचा असेल की, त्यांना काही ॲडिशनल जमीन द्यायची आहे तर सिडकोला त्याचे पेमेंट केले पाहिजे किंवा सिडकोला त्याऐवजी तितकीच जमीन मिळाली पाहिजे असे व्यवस्थापकीय संचालक सिडको यांनी समितीस नमूद केले.



विनंती अर्जदार, श्री. मनोहर भोईर वि.स.स. यांनी अशी मागणी केली की, १९८६ साली शेवा गाव हे एकच गाव होते. तेथील आग्री आणि कोळी या दोन समाजापैकी कोळी समाजाचे पुनर्वसन हनुमान कोळीवाडा या नवीन गावामध्ये झाले. हे गाव वसल्यानंतर ८ ते १० वर्षांनी संपूर्ण गावालाच वाळवी लागली. जवळजवळ ९५ टक्के घरांना वाळवी लागलेली आहे. कोळी समाज हा समुद्रकिनारी रहाणारा समाज आहे. घरामध्ये झोपले तर घर पडून त्यांचा जीव जाऊ शकतो किंवा मोठी दुखापत होऊ शकते. त्यामुळे तेथील नागरिक घरामध्ये न झोपता समुद्रकिनारी किंवा बाहेर झोपतात. अशा परिस्थितीत त्यांना सर्पदंश होऊ शकतो किंवा इतर प्राण्यांद्वारे प्राणघातक हल्ला होऊ शकतो. या गावातील नागरिक दुर्दैवी जीवन जगत आहेत. त्यामुळे सदरहू हनुमान कोळीवाडा गावाचे दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे. जेएनपीटीची जसकार येथे जागा असून या जागेचा विभागीय आयुक्त व एसडीओ यांनी सर्व्हे केलेला आहे. तसेच जुना शेवा गावामध्ये जेएनपीटीने काहीच केलेले नसल्यामुळे ते गाव खंडर असल्यासारखे झालेले आहे. त्या ठिकाणी जागा दिली तरी हे नागरिक तेथे परत जाऊ शकतात. जेणे करून तेथे समुद्रकिनारा असल्यामुळे त्यांना व्यवसायाच्या दृष्टीने हिताचे होईल. त्यामुळे हनुमान कोळीवाडा हे गाव वाळवीग्रस्त झाल्यामुळे त्याचे जुना शेवा गावाच्या ठिकाणी पुन्हा पुनर्वसन करण्यात यावे, अशी मी सदरहू नागरिकांच्या वतीने मागणी करतो. आजच्या बैठकीस नवीन शेवा गाव व हनुमान कोळीवाडा गावातील पदाधिकारी मोठ्या अपेक्षेने आलेले आहेत. आपल्याला लवकरात लवकर न्याय मिळेल अशी येथील ग्रामस्थांची आशा आहे. शासनाची भूमिका देखील सकारात्मक आहे. जमिनीचे पैसे कोणी द्यावे, हीच त्यामध्ये अडचण असून हा विषय सोडवून आमची मागणी पूर्ण करावी.

अध्यक्ष, जेएनपीटी यांनी समितीला अशी माहिती दिली की, हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा ही दोन गावे ॲफेक्टेड आहेत. तहसिलदारांच्या अहवालामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, सर्व्हे नं. ११२ पैकी एकूण क्षेत्र १५ हेक्टर ७५ आर एवढी जमीन प्रकल्प बाधितांकरिता संपादन करून ४ हेक्टर ९७ आर. क्षेत्र २३८ कुटुंबाना प्लॉटसाठी देण्यात आलेले आहे. नागरी सुविधा व मोकळी जागा यासाठी १०.४८ हेक्टर तसेच ५ हेक्टर क्षेत्र वजा जाता, ५ हेक्टर २७ आर अजूनही शिल्लक आहे. ही जागा कुठे शिल्लक आहे, जिल्हाधिकारी यांच्याकडून याबाबतची माहिती मिळणे गरजेचे आहे. पुनर्वसनासाठी १५ हेक्टर जमीन लागणार आहे. त्याला जो निधी लागणार होता, त्या पूर्ण रकमेची भरपाई जेएनपीटी कडून करण्यात आलेली आहे. पुनर्वसनासाठी इन्फ्रास्ट्रक्चर करिता लागणारा खर्च जेएनपीटीने १९८५, १९८७ मध्ये केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी शिल्लक असलेल्या साडेपाच हेक्टर जागेबाबत सांगितले. मूळ १५ हेक्टर जागा सिडकोच्या ताब्यात आहे. सिडकोने डिमार्क केलेल्या १५ हेक्टर जमिनीचे आम्ही पूर्ण पैसे दिलेले आहे.

यावर उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सिडको यांनी समितीला अशी माहिती दिली की, पैसे आमच्याकडे येत नव्हते. पैसे जिल्हाधिकारी यांच्याकडे येत होते. आमच्याकडे १९८५ पासून पजेशन आहे. जिल्हाधिकारी यांनी पजेशन दिले असून ती जमीन आमच्या ताब्यात आहे. आमच्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये त्याबाबीचा उल्लेख आहे. तसेच सिडकोच्या टोटल कॅल्क्युलेशनमध्ये त्याचा उल्लेख आहे. यामध्ये दोन कम्पन्सेशन आहे. त्यापैकी एक पैशाची होती व दुसरी साडेबारा टक्क्याची होती. आम्ही साडेबारा देत आहोत. साडेबारामध्ये ५० टक्के दिलेली असून इतर कामे सुरू आहेत. जमीन आमची आहे. यापूर्वी १३.७५ हेक्टर जमीन देण्यात आलेली आहे. १२.५० टक्के देत असलेल्या जमिनीच्या बदल्यात जमीन किंवा पैसे मिळाले पाहिजे. आता आमच्या ताब्यातील साडेपाच हेक्टर जमीन द्यायची आहे. त्यातील एक पार्ट ओरिजनल १५.७५ मध्ये होता, त्या एका प्लॉटची अलॉटमेंट साडेबारा मध्ये केलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य म्हणत आहेत त्याप्रमाणे आमची काही जमीन अजून शिल्लक आहे.

समितीने असे सुचित केले की, आपल्याला यातून मार्ग काढावयाचा आहे. या नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. तसेच केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीनजी गडकरी यांनी देखील जेएनपीटीच्या वतीने याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले आहे. या नागरिकांना न्याय मिळाला पाहीजे अशी समितीची सुद्धा इच्छा आहे.

यावर प्रधान सचिव, नगरविकास (१) यांनी समितीस माहिती दिली की, यासंदर्भात बऱ्याच वेळा बैठका झालेल्या आहेत. खूप पत्रव्यवहार झालेला आहे. सन्माननीय सदस्यांचे अथवा त्या भागातील लोकांचे म्हणणे समितीसमोर आलेले आहे. मूळ सर्व्हे करून लॅण्ड ॲक्विजेशन केले, तसेच वाटपासंबंधीच्या बाबी ठरविणारे महसूल विभागाचे विभागीय आयुक्त, सिडको तसेच जेएनपीटी यांची एकत्रित बैठक घ्यावी लागणार आहे. जेएनपीटी मध्ये महाराष्ट्र कॅडरचे अधिकारी असल्यामुळे त्यांचा आपल्याला फायदा होऊ शकेल. मागील वर्षी याच ठिकाणी बैठक झाली होती. तेव्हा आपल्याला फार काही सहकार्य मिळाले नसल्याची बाब आपल्या कार्यवृत्तामध्ये असेल. परंतु आता सकारात्मक भूमिका राहिल. येत्या १५ दिवसाच्या आता या विषयासंदर्भात विभागीय आयुक्त, महसूल, सिडको व जेएनपीटी या तीनही यंत्रणांची शासन स्तरावर बैठक घेण्यात येईल. या बैठकीस महसूल विभागाच्या सचिवांना देखील बोलविण्यात येईल. कोळीवाडा या संपूर्ण गावाला वाळवी लागल्यामुळे त्या गावाचे दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन करणे किंवा त्या लोकांना तेथेच दुसरी घरे बांधून दिली जातील.

**१.३ उपरोक्त विनंती अर्जासंदर्भात समितीने पुन्हा बुधवार, दिनांक ११ मे, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.**

सदरहू साक्षीत शासनाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, विभागीय आयुक्त, कोकण, अध्यक्ष, जे.एन.पी.टी. व जिल्हाधिकारी, रायगड यांच्या समवेत दि.२ फेब्रुवारी, २०१६, दि. २४ फेब्रुवारी, २०१६ व दि. ९ मे, २०१६ रोजी मा. प्रधान सचिव (नवि-१) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील



चर्चेनुसार नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासाठी संपादित करण्यात आलेल्या ३३.६४ हे.आर. क्षेत्राबाबतच्या अभिलेखाची तपासणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

यासंदर्भात विनंती अर्जदार श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांनी समितीला असे नमूद केले की, ३३ हेक्टर जमीन नवीन गावासाठी तर १६ हेक्टर जमीन हनुमान कोळीवाड्यासाठी दिलेली आहे. त्यापैकी १० हेक्टरवर गावाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. तर उर्वरित जमीन शासनाकडेच आहे. या सर्व जमिनीचे पैसे जेएनपीटीने दिलेले आहेत. त्यांनी पुरावे सादर केलेले आहेत. सदरचे पैसे सिडकोला दिले की जिल्हाधिकारी कार्यालयास दिले हा आमचा प्रश्न नाही. पैसे मिळाले किंवा कसे याचे निष्कारण जिल्हाधिकारी यांनी यापूर्वीच करणे आवश्यक होते. जेएनपीटी बंदरासाठी आम्ही आमचे गाव तसेच आमच्या जमिनी दिलेल्या आहेत. सध्या आम्ही १० x १० आकाराच्या रुममध्ये राहत आहोत कुटुंबाचा विस्तार झालेला आहे. त्यामुळे वाढीव गावठाण मिळणे आवश्यक आहे. यासंदर्भात नगरविकास विभागाच्या सचिवांनी ही बाब मान्य केली आहे. याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा असे सांगितले.

विभागीय सचिव (नगरविकास विभाग) यांनी यासंदर्भात समितीस सांगितले की, पैसे दिलेले आहेत हि बाब जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच ही बाब भूसंपादन अधिकारी यांचे रेकार्डवर आली पाहिजे हा प्रश्न जोपर्यंत निकाली निघत नाही तोपर्यंत यामधून मार्ग निघाणार नाही तसेच आता ५ हेक्टर वाढीव जमिनीसाठी जे.एन.पी.टी ने पैसे देणे आवश्यक आहे. तसेच साडेबारा टक्के जमिनीचा वाढीव मोबदला द्यावा लागणार आहे. त्यामुळे यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही असे समितीस विदीत केले.

उपरोक्त प्रकरणी जे.एन.पी.टीच्या अधिकाऱ्यांनी समितीस सांगितले की दिनांक ९ मे, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत उप जिल्हाधिकारी भूसंपादन, मेट्रो सेंटर यांनी तयार केलेल्या अहवालात यांची संपूर्ण रक्कम अदा केलेली आहे. त्यामुळे हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा या गावांतील संपादित जमिनीचा मोबद्दला वाटपासाठी जेएनपीटीकडून पैसे अदा करण्यात आल्याचे दिसून येते असे अहवालात स्पष्ट केले आहे.

त्यावर विभागीय आयुक्त कोकण भवन यांनी समितीला अशी माहिती दिली की, सगळ्या जमिनी सिडको हद्दीतील आहेत. त्या जमिनी सिडकोच्या नावे संपादित करण्यात आलेल्या आहेत. जेएनपीटीसाठी आपण स्वतंत्र जमीन संपादित करीत होतो. जेएनपीटीने संपादनाचे पैसे भरलेले आहेत. मुख्य प्रकल्पाचे देखील जेएनपीटीने पैसे भरलेले आहेत. हे पुनर्वसनाचे क्षेत्र आहे. संपादनाचे पैसे जेएनपीटीने दिले असतील, पुनर्वसनासाठी जमीन संपादित केली असेल तर त्याचे वाटप करावे लागेल. येथे पैसे कोणी भरावयाचे हा मुद्दा आहे. याचा राज्य व केंद्र शासनाशी संबंध येतो. प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यात आल्यानंतर १५ हजार रुपये एक्स-ग्रेशिया म्हणून देण्यात आले होते. एक्स-ग्रेशियासाठी जेएनपीटीकडून वारंवार निधी आलेला आहे. त्याच्या नोंदी आमच्याकडे आहेत. परंतु, पुनर्वसनासाठी जमीन संपादित केली आहे त्यासाठी जेएनपीटीने

नेमके किती पैसे दिलेले आहेत हे सर्व कागदपत्र तपासल्याशिवाय आम्ही खात्रीशीररित्या सांगू शकत नाही. कारण मुख्य प्रकल्पासाठी जमीन संपादित केली त्यावेळी त्यांना पुनर्वसनाचे काहीच फायदे दिले नव्हते. त्यावेळी आंदोलन झाले होते. त्यानंतर एकरी १५ हजार रुपये एक्स-ग्रेशिया देण्यात आला होता. एक्स-ग्रेशियाचा रेकॉर्ड आमच्याकडे आहे. पण या संपादनासाठी जेएनपीटीकडून किती पैसे आले होते हे कागदपत्र पाहिल्याशिवाय काहीच सांगता येणार नाही.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, हनुमान कोळीवाडा संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांनी माहिती दिली की, हनुमान कोळीवाड्याच्या विषयाबाबत आम्ही एका ठराविक निष्कर्षाप्रत आलेलो आहोत. याचे पैसे जेएनपीटीने दिलेले आहेत. सिडकोचे बोर्ड रिझर्व्हेशन सुद्धा सापडलेले आहे. सिडकोकडे ६ हेक्टर असल्याचे सांगण्यात आले. ताबा मिळण्याचा एक छोटासा विषय आहे. तेथील लोकांना हलवायचे असेल तर जेएनपीटीने सिडकोला ६ हेक्टर जमीन एक्सचेंजमध्ये द्यायला हवी. ही जागा सुद्धा आपण बघितलेली आहे. जेएनपीटी सुद्धा हे मान्य करेल असे वाटते.

**१.४ उपरोक्त विनंती अर्जासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने पुन्हा मंगळवार, दिनांक २४ मे, २०१६ रोजीच्या विभागीय सचिवांची साक्ष घेतली.**

साक्षीच्या वेळी नगरविकास विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की, जी जमीन पुनर्वसनासाठी वापरण्यात आली त्यासाठी निधी कोणत्या यंत्रणेकडून आला या संबंधीचा प्रश्न मागच्या बैठकीमध्ये अनुत्तरित राहिला होता. यासंबंधातील स्पष्टता विभागीय आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर कागदपत्र पाहून केलेली आहे. त्यांच्या अहवालात सकृतदर्शनी दिसून येत आहे की, ही जमीन संपादित करण्याचा खर्च जेएनपीटीने दिला होता. त्यामुळे उर्वरित ५ हेक्टरचे वाटप करण्यास सिडकोकडून कोणतीही अडचण येणार नाही. त्यांनी दुसरा प्रश्न शासनानकडे उपस्थित केला आहे. पूर्वी जेएनपीटीच्या प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात आले तेव्हा त्यांना इतर कोणतेही फायदे देण्यात आले नव्हते. त्यामुळे त्यांना ठराविक वाढीव मोबदला देण्यात आला होता. त्यावेळी वाढीव साडेबारा टक्के मोबदला जेएनपीटीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीसाठी नव्हता. दरम्यानच्या काळात राज्य व केंद्र शासनाची याच विषयावर बरीच चर्चा होऊन त्या लोकांना देखील साडेबारा टक्के मोबदला देण्याचा निर्णय झालेला आहे. यासाठी जेएनपीटीने जमीन शोधली असून त्यावर कारवाई सुरू आहे. एकाच व्यक्तीला साडेबारा टक्के आणि वाढीव प्लॉट असा दुहेरी फायदा मिळेल काय अशा प्रकारचा विचार विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अहवालात नमूद केला आहे. यासंबंधीचा निर्णय स्वतंत्रपणे होईल. दोन्ही लागू नसतील तर मग साडेबारा टक्केमध्ये जी काही त्यांची इनटायटलमेंट असेल त्यातून दीड गुंठे जमीन कमी होईल. जमिनीच्या संपादनापोटी जो खर्च झाला आहे तो कोणी केलेला आहे, पायाभूत सुविधांवर खर्च कोणी केला आहे याची माहिती मी प्राप्त करून घेतलेली आहे. संपादन सिडकोच्या नावे झालेले आहे. यासाठी आलेला निधी विभागीय आयुक्तांमार्फत देण्यात आलेला आहे. त्याची प्रतिपूर्ती जेएनपीटीने



केलेली आहे. पुनर्वसनासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. त्यावरील खर्च देखील जेएनपीटीकडून देण्यात आलेला आहे. ही सर्व माहिती माझ्याकडे जे अभिलेख होते त्यावरून तयार करून शासनाला सादर केलेली आहे.

यावर विनंती अर्जदार श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांनी अशी माहिती दिली की, साडेबारा टक्के योजना सन २०१४ मध्ये नव्याने लागू करण्यात आली आहे ही बाब मी शासनाच्या नजरेस आणली आहे. साडेबार टक्के योजनेला आपण टच करू नका असे आमचे म्हणणे आहे. आम्ही पुनर्वसित आहोत. आमचे पुनर्वसन झालेले आहे. आम्हाला वाढीव गावठाणासाठी जमीन मिळावी एवढीच आमची मागणी आहे.

याबाबत प्रधान सचिव नगरविकास यांनी अशी माहिती दिली की, आपल्या समोर दीड गुंठे जमिनीच्या प्लॉटचा विषय होता. तो एका बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद आहे. त्यावर विभागीय आयुक्तांचा अहवाल देखील आहे. त्या इतिवृत्तामध्ये २-३ मुद्दे आहेत. एक म्हणजे दीड गुंठा जमीन कोणाला मिळेल आणि दुसरे म्हणजे ज्यांना जमीन दिली आहे ती काढून घ्यायची काय? अशा प्रकारच्या बऱ्याचशा गोष्टी यात आहेत. त्या सर्व गोष्टींचा विचार करून सन २०१३ मध्ये विभागीय आयुक्तांनी अहवाल दिला आहे. कुठली जमीन द्यायची आणि त्यासाठी येणारा खर्च कोणी भागवायचा असा प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाला होता. सिडकोचे असे म्हणणे होते की, सदर जमीन आम्ही संपादित केलेली आहे त्यामुळे त्या जमिनीचा मोबदला जेएनपीटीने आम्हाला द्यावा. या प्रश्नातून आता आपण बाहेर पडलो असून ही जमीन आता आपल्याकडे उपलब्ध आहे. त्याचे प्लॉट विभागीय आयुक्तांच्या अहवालाप्रमाणे आणि १९८६ च्या अहवाला प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यावर समितीने निदेश दिले की, ही संपूर्ण कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावी त्यानुसार विभागीय सचिवांनी विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

**२.१** जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून एकूण २६१७ आर.हे. इतकी जमीन संपादित करण्यात आली होती. सदर प्रकल्पासाठी उरण तालुक्यातील १२ गावातील जमीन संपादित करण्यात आली असून त्यापैकी मूळ शेवा गावाचे गावठाण व लगत असणाऱ्या कोळीवाडा गावाचे गावठाण बाधित झाले होते. मूळ शेवा गावाचे पुनर्वसन मौजे बोकडवीरा येथील गावठाणात नवीन शेवा येथे तर कोळीवाडा गावठाणाचे पुनर्वसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आले. सदर जागेचे संपादन सिडको/न्हावा-शेवा पोर्टसाठी झालेले असल्याने या प्रकरणी महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुनर्स्थापना कायदा, १९७६ च्या तरतूदी लागू होत नसल्याने त्या गावठाणांच्या पुनर्वसनांसाठी तत्कालीन पुनर्वसन मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ मे, १९८६ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार नवीन शेवा गावठाणाच्या पुनर्वसनासाठी एकूण

१५.७५.५ हे.आर. इतके क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. त्या क्षेत्रापैकी ४.९७.०१ हे.आर. क्षेत्र भूखंडासाठी वाटप करण्यात आले असून नागरी सुविधांसाठी ५.५१.४९ हे.आर. वापरण्यात आले आहे, तर ५.२७.० हे.आर. क्षेत्र वाटपासाठी शिल्लक आहे.

नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासाठी ३३.६४.५ हे.आर क्षेत्र ताब्यात घेतले असूनही केवळ १० हे.आर. जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले असून उर्वरित २३ हे. महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ नुसार देय असून त्याप्रमाणे भूखंड देण्यात यावेत अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. प्रकल्पग्रस्तांची सदरची मागणी ही संपादनासाठी करण्यात आलेल्या जमिनीच्या ताबा पावतीच्या अनुषंगाने आहे.

मूळ शेवा गाव व कोळीवाडा या गावाचे पुनर्वसन नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा येथे सन १९८६-८८ मध्ये करण्यात आले. पुनर्वसन करताना शासनाने पुनर्वसनासाठी एकूण १५.७५.५ हेक्टर इतकी जमीन उपलब्ध करून दिली त्यापैकी ४.९७.०१ हेक्टर क्षेत्र भूखंडासाठी तर ५.५१.४९ हेक्टर क्षेत्र नागरी सुविधांसाठी राखीव ठेवण्यात आले तथापि, पुनर्वसन करताना १० हेक्टर जमिनीवर नागरीकांना फक्त जोत्याखालील एवढीच जागा दिली आणि अद्यापही ५.२७.० हेक्टर क्षेत्र शिल्लक आहे. सदरहू गावातील नागरीकांचे कुटूंब मोठे झाले आहे. सद्या १० × १० च्या छोट्याशा घरात राहात आहेत, राहाण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे शिल्लक राहिलेल्या जमिनीवर भूखंड तयार करून त्याचे वाटप करण्यात यावे अशी मागणी वारंवार शासनाकडे करूनही शासनाने त्याची दखल घेतली नाही. तसेच सभागृहात या विषयावर लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली. शासनाने आजपर्यंत फक्त आश्वासनेच दिली परंतु प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आली नाही. अशी माहिती समितीसमोर आली आहे.

यासंदर्भात समितीने शासनाच्या नगरविकास विभाग आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विभागातील सचिवांची व अधिकारी यांची साक्ष घेतली असता उक्त साक्षीत शासनाने शिल्लक राहिलेली जमीन पुनर्वसनासाठी देण्याचे मान्य केले. परंतु सदरहू पैशाचा भरणा जेएनपीटीने केला किंवा कसे याबाबत निश्चित माहिती दिली नाही. यासंदर्भात जेएनपीटीने पुनर्वसनासाठी लागणारा सर्व खर्च पैशाच्या रुपाने जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे त्याचवेळेला भरणा केला असल्याचे सांगितले आणि यासंदर्भात त्यांनी पुरावे सादर केले आहेत. परंतु जिल्हाधिकारी यांचेकडे त्याबाबतचे कागदपत्रे सापडली नाहीत. एखाद्या गावाचे पुनर्वसन करण्याबाबतची कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यलायातून गहाळ होणे किंवा शोधुनही न मिळणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. यासंदर्भात कागदपत्रांचे योग्य प्रकारे जतन केले नसल्याचे दिसून येते. ज्या लोकांचे पुनर्वसन करण्यात आले त्यांना राहण्यासाठी पुरेशी जागा मिळत नसल्याने त्यांच्या हालअपेष्टा त्यांना होणारा त्रास, याबाबत जिल्हाधिकारी यांनी कोणतीही काळजी घेतली असल्याचे दिसून येत नाही. एकूणच या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालयातील आधिकारी/कर्मचारी यांचा पराकोटीचा निष्काळजीपणा दिसून येतो.

**तसेच समितीसमोर बाब चर्चेला येऊन देखील संबंधीत अधिकारी वेळकाढूपणा करीत असल्याचे समितीच्या निर्देशनास आले. वास्तविक पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध असताना आणि जेएनपीटीने सर्व पैसे राज्य शासनास अदा केलेले असतानाही राज्य शासनाने तात्काळ निर्णय घेऊन भूखंडाचे वाटप करणे आवश्यक होते. परंतु या प्रकरणाकडे तेवढ्या गांभिर्याने पाहिले गेलेले नाही असे समितीचे स्पष्ट मत झाले असून कागदपत्रे गहाळ करणाऱ्या सर्व संबंधीतांवर कारवाई करण्याबरोबरच प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या जागेचे शासनाने तात्काळ वाटप करण्यात यावे असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. प्रकल्पग्रस्तांचे वेळेत पुनर्वसन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी कर्तव्यभावनेने अत्यंत जागारूक राहून पुनर्वसनासंबंधीच्या सर्व प्रक्रिया कायदेशीर रित्या पार पाडून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकरणी नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनसाठी एकुण १५.७५.५ हेक्टर आर इतके क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. त्या क्षेत्रापैकी ४.९७.०१ हेक्टर आर क्षेत्र भुखंडासाठी वाटप करण्यात आले असून नागरी सुविधांसाठी ५.५१.४९ हेक्टर आर वापरण्यात आले असून ५.२७.० हेक्टर आर क्षेत्र वाटपासाठी शिल्लक असल्याचे समितीसमोर आढळून आले आहे. एकूण ताब्यात घेतलेल्या क्षेत्रापैकी १० हेक्टर आर जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले असून उर्वरित २३ हेक्टर आर क्षेत्र महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुनर्वसन कायदा, १९७६ अन्वये देय असून त्या संदर्भातील जमिनीचे शुल्क जेएनपीटीने राज्य शासनास अदा केलेले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयालीत सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी याबाबत नस्ती गहाळ केल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्याने अद्यापही संबंधीतांवर कारवाई केली नाही याप्रकरणी कोणतीही चौकशी केली नाही अथवा नस्ती गहाळ करणा-या जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर कोणतीही कारवाई केली नाही. याबाबत समिती अत्यंत खेद व्यक्त करते व सर्वसंबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध त्वरेने चौकशी करून त्यांचेविरुद्ध कडक स्वरुपाची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**





**२.२** पुनर्वसनासाठी शिल्लक असलेली ५ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात आहे. सिडकोने नमूद केले की जेएनपीटीने जमिनीचे पैसे जिल्हाधिकारी यांच्याकडे भरणा केले आहे. आम्हाला पैसे मिळाले नाहीत सदरची जमीन आम्ही विकसीत केली आहे आम्हाला आता बाजारभावाप्रमाणे पैसे द्यावेत अशी मागणी केली आहे. तथापि, यासंदर्भात ज्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे त्यांचा या गोष्टीशी काहीही संबंध नाही. सदरची बाब शासनाच्या दोन विभागामधील आहे. त्यांनी त्याबाबत सामंजस्याने निर्णय घेणे आवश्यक आहे. जेएनपीटीमध्ये महाराष्ट्र केडरचे आधिकारी आहेत तसेच केंद्रिय मंत्री श्री. नितीन गडकरी आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्यामध्ये बैठक होऊन यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे निर्णय सकारात्मक व लवकरात लवकर होऊ शकतो. अशी समितीची धारणा आहे. **जेएनपीटीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पैसे अदा करूनही त्याबाबतचे रेकॉर्ड उपलब्ध नाही असे शासनाने समितीसमोर सांगितले. त्यामध्ये प्रकल्पबाधीतांना देय असलेली जागा अद्यापही देण्यात आली नाही. त्यामुळे नवीन शेवा गावातील लोकांना नाहक त्रास होत आहे. शासनाने त्यांना जमीन / जागा उपलब्ध असुनही अद्यापपर्यन्त त्यांना जमीन/ जागा उपलब्ध करून दिली नसल्याने समिती याबाबत तीव्र खेद व्यक्त करते. याप्रकरणी पात्र प्रकल्पबाधीतांना देय असलेली जमीन/जागा वितरित करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने तात्काळ कार्यवाही प्रस्तावित करून सर्व संबंधीतांना नियमानुसार व शासनाने जाहीर केलेली जागा त्वरेने देण्यात यावी, व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी. अशी समितीची शिफारस आहे.**

**२.३** साक्षीच्या वेळी स्थानिक ग्रामस्थांनी असे नमूद केले की पुनर्वसनासाठी असलेल्या जमिनीचे पैसे जेएनपीटीने दिलेले आहेत. त्यामुळे सिडकोने सदरची जमीन आपल्या ताब्यात ठेवायला नाही पाहिजे सदरची जमीन गावकऱ्यांच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात सिडकोने साडेबारा टक्के जमीन दिलेली असल्याचे सांगितले, साडेबारा टक्के देण्याचा निर्णय हा ज्या ग्रामस्थांच्या जमिनी सिडकोने स्वतःच्या प्रकल्पासाठी संपादित केल्या. त्यांना साडेबारा टक्क्यातून जमीन दिली जाते. परंतु हि जमीन जेएनपीटीसाठी संपादित करण्यात आली असल्याने या जमिनीला सिडकोने स्वतःच्या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या इतर शेतकऱ्यांना जमिनीचा परतावा देण्यासाठी साडेबारा टक्क्याचा नियम लावणे योग्य होणार नाही. सदरची जमीन सिडकोने विकसीत केल्याचे म्हटले आहे. तथापि सदरची जमीन इतर प्रकल्पाच्या (जो प्रकल्प सिडकोचा नाही) पुनर्वसनासाठी राखीव असल्याने सिडकोने जमीन ताब्यात घेणे हे अयोग्य असल्याचे समितीचे मत आहे. **समितीसमोर विनंती अर्जाच्या माध्यमातून चर्चाधीन असलेल्या जमीन प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी राखीव असल्याने शासनाने आदेशीत केलेल्या जमिनीचा वापर केवळ पुनर्वसनाच्या कामासाठीच करावा तसेच जेएनपीटीने ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला राज्य शासनास दिला असल्याने पुनर्वसनसाठी राखीव असलेल्या जमिनीचा वापर नवीन शेवा या गावाच्या पुनर्वसीत नागरीकांसाठी करण्यात यावा तसेच या जमिनीवर पुनर्वसनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उर्वरित जमीन शासनास योग्य वाटेल त्याप्रमाणे इतर प्रयोजनासाठी तीचा वापर करावा व या प्रकरणाची कारवाई त्वरेने करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**२.४** हनुमान कोळीवाडा गावाचे ज्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले त्या ठिकाणी १० वर्षानंतर संपूर्ण गावाला वाळवी लागली आहे. त्यामुळे सदरची घरे केव्हाही पडू शकतात. सदरहू गावाचे पुनर्वसन करण्यासाठी सहा हेक्टर जागा दिली होती. परंतु दोन हेक्टरमध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. ज्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले तो भाग वाळवीग्रस्त आहे. त्यामुळे तेथील लोक राहत्या घरामध्ये न झोपता समुद्रकिनारी किंवा उघड्या जागेवर झोपतात, त्यामुळे त्यांना सर्पदंश होऊ शकतो तसेच इतर प्राण्यांकडून हल्ला होऊ शकतो, या गावातील नागरिक दुर्देवी जीवन जगत आहे. त्यामुळे त्यांचे इतर ठिकाणी पुनर्वसन होणे आवश्यक आहे.

सदरहू गावाचे पुनर्वसन करताना कमीत कमी ४० चौरस मिटरचा भूखंड देणे आणि कुटुंबातील प्रौढ व्यक्तीच्या नावाने अतिरिक्त दिड गुंठे जमीन देणे असा निर्णय झालेला असतानाही अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. जेएनपीटी यांची जसकार येथे जागा असून याबाबत विभागीय आयुक्त आणि उप विभागीय अधिकारी यांनी सर्व्हे केलेला आहे. सदरच्या ठिकाणी पुनर्वसन केले तर समुद्रकिनारा जवळ असल्यामुळे ते त्यांचा व्यवसाय करू शकतात. उपरोक्त प्रकरणी सर्व पार्श्वभूमी तयार आहे. फक्त शासनाकडून यावर निर्णय होणे अपेक्षित आहे. तथापि, गावाचे पुनर्वसन झाल्यानंतर १० वर्षानी गावाला वाळवी लागूनही शासनाने ही बाब गंभीरपणे घेतली नसल्याचे दिसून येते तसेच शासनाचा निष्काळजीपणा आणि वेळकाढूपणाचे धोरण स्पष्ट होते.





**उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेऊन हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन करण्यात यावे तसेच शासनाच्या निर्णयाप्रमाणे प्रकल्प बाधीतांतील प्रत्येक कुटुंबाला देय असलेली ४० चौ.मी. भूखंड आणि कुटुंबातील प्रौढ व्यक्तीच्या नावाने अतिरिक्त दिड गुंठा जमीन देण्याबाबत त्वरेने कारवाई करावी व याबाबत त्वरित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिण्यात पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

## परिशिष्ट - एक

## (श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचा विनंती अर्ज)



**श्री. मनोहर भोईर**
**विधानसभा सदस्य**
**मतदार संघ- उरण**

18 SEP 2015

**विधानसभा विनंती अर्ज**

दिनांक- 27 AUG 2015

प्रति,
मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र विधानसभा,
विधानभवन, मुंबई.

(हरिभाऊ बागडे)
अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा
विधान भवन, मुंबई

**विषय- जेएनपीटीने नविन शेवा ( ता. उरण.जि. रायगड) गावाच्या जमिनीकरिता शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत ग्रामस्थाचां विनंती अर्ज .**

महोदय,

महाराष्ट्र विधानसभा नियम २६७ अन्वये मी, नविन शेवा (ता. उरण, जि.रायगड) येथील ग्रामस्थाची विधानसभेस विनंती अर्जाची प्रत देत आहे.

उरण जि. रायगड येथे जेएनपीटी बंदरासाठी नविन शेवा व कोलीवाडा या गावांचे पुनर्वसन १९८७ साली झाले आहे. त्यावेळेत घरांच्या जोत्यासाठी जमिन देण्यात आली होती. परंतु नविन शेवा या गावासाठी ३३.६४ हेक्टर जमीन कायदयानुसार मंजूर करणेत आलेली होती. त्यांची संपूर्ण रक्कम जेएनपीटीने सन १९८३ ते १९८५ दरम्यान टप्प्याटप्प्याने अदा केले आहेत. परंतु नविन शेवा या गावाचे पुनर्वसन फक्त १०.४७ हेक्टर एवढयाच जागेवर केले गेले आहे. उर्वरित शासनास संपूर्ण जमिनीचे पैसे भरलेले असतांनाही अद्याप शिल्लक जमिन उपलब्ध झालेली नाही. तसेच त्यावेळस शासनाने प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना १.५ (दिड ) गुंठे जमिन देण्याचे नमूद केल्याप्रमाणे अद्यापही दिले गेले नाही. सदर गावांना नैसर्गिक वाढी पोटी वाढीव गावठाण सुध्दा देण्यात आलेले नाही. तसेच हनुमान कोलीवाडा या गावाला वाळवीच्या प्रादुर्भाव झाल्याने या गावाचे फेरपुनर्वसन करणे गरजेचे झाले आहे. या विषयांची **लक्षवेधी मी, डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनात सभागृहात मांडली होती. त्यास मा. मंत्री यांनी लोकसंख्येत वाढ झाल्याची बाब खरी आहे. प्रकल्पग्रस्त लोकांकडून आणखी जमिनीची मागणी असल्यास या बाबतीत जेएनपीटी, सिडको यांच्या समवेत विचार विनिमय केला जाईल. शासन या संबधी सकारात्मक आहे. या प्रकरणी आणखी जमिनीची मागणी असल्यास ती देण्याची शासनाची भूमिका आहे. असे आश्वासन दिले गेले आहे.**

सध्या तेथील प्रकल्पग्रस्त नागरिकांमधून सदर गावासाठी आरक्षित व संपूर्ण पैसे भरलेल्या जमिनीची खूप मोठया प्रमाणात गरजेपोटी मागणी होत आहे. आपली विनंती अर्ज समितीचे संपर्क बाधित जनतेशी येतो त्यामुळे या अत्यंत महत्वाच्या बाबीकडे तातडीने लक्ष घालून दिलेल्या आश्वासनाची लवकरात लवकर पूर्तता करण्याच्या दृष्टीने सदर विनंती अर्ज कृपया मान्य करण्यात यावा आणि अहवाल सादर करण्याकरिता विधानसभा विनंती अर्ज समितीकडे पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला ,

(मनोहर भोईर )

१. सोबत आपल्या माहितीसाठी लक्षवेधीची प्रोसेडिंग
२. शासनास केलेले पत्र व्यवहार
३. जेएनपीटीने शासनास अदा केलेल्या रक्कमेचे विवरण पत्र

(३)

श्री.जनार्दन पांडूरंग म्हात्रे
आणि ग्रामस्थ.
ग्रामपंचायस नवीन शेवे.
ता.उरण, जि.रायगड
दि. २४/०८/२०१५.

प्रति,
मा.श्री. मनोहर भोईर
आमदार.
उरण , जि. रायगड.

विषय - **नवीन शेवा गावच्या पुनर्वसनासाठी देण्यात आलेली ३३.६४ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात असून सदर जमीन नवीन शेवा या पुनर्वसन झालेल्या गावाला मिळणेबाबत विनंती अर्ज.**

महोदय,

आपणास या विनंती अर्जाव्दारे आम्ही कळवू इच्छितो की, नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड या गावाचा पुनर्वसन जेएनपीटी बंदर उभारतांना १९८७ साली शासनाने केलेला आहे. सदर पुनर्वसन करते वेळी अनेक आंदोलने झाली होती. त्यात अनेक हुतात्म्यांचे बलीदान झाले आहे. नवीन शेवा या गावाला शासनाने त्यावेळेस ३३.६४ हेक्टर जमीन मंजूर केलेली आहे. सदर ३३.६४ हेक्टर संपूर्ण जमीनीची रक्कम जेएनपीटीने शासनास आदा केलेली आहे. परंतू अद्यापपर्यंत सदर जमीन पुनर्वसन झालेल्या गावाला न देता सिडकोने आपल्या ताब्यात ठेवली आहे. नवीन शेवा गावाचे पुनर्वसन फक्त १०.४७ हेक्टर जमीनीवर केले आहे. व उर्वरित जमीन अद्याप सिडकोने आपल्या ताब्यात ठेवलेली आहे. सदर जमीन पुनर्वसन झालेल्या गावास मिळावी म्हणून ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा शासनास पत्रव्यवहार करुन सुध्दा अद्यापपर्यंत यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.

जेएनपीटी बंदरासाठी नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांचे पुनर्वसन सन १९८७ साली केले होते. त्यावेळेस फक्त घरांच्या जोत्याखालची जमीन देऊन पुनर्वसन करण्यात आले होते. त्यावेळेस सदर गावची लोकसंख्या अंदाजे फक्त १५०० होती. ती आता ३००० पेक्षाही जास्त झालेली आहे. गावाच्या वाढीव गावठाणासाठी शासनाने कोणतीही तरतूद केलेली नाही. तरी आपणास या विनंती अर्जाव्दारे आम्हा ग्रामस्थांची विनंती आहे की, आमच्या नवीन शेवा या पुनर्वसन झालेल्या गावांसाठी शासनाने मंजूर केलेली व सदर जमीनीची संपूर्ण रक्कम शासनास अदा केलेली जमीन ग्रामस्थांना मिळावी, अशी आपणास नम्र विनंती आहे.

आपले नम्र.

( जनार्दन पांडूरंग म्हात्रे )

| ग्रामस्थांची नावे - | सही | |
|---|---|---|
| १. श्री.जगजीवन ~~म्हात्रे~~ भोईर | [signature] | 9833800577 |
| २. श्री.गणेश घरत | [signature] | 9004687110 |

२





..२..

| | | |
|---|---|---|
| ३.श्री.हिराजी घरत | हिराजी घरत | 9323200110 |
| ४. श्री. शैलेश भोईर | [signature] | 9594502131 |
| ५. श्री. अजय कोळी | A Koli | 9768610773 |
| ६. श्री. कृष्णा घरत | K Gharat | 9820952927 |
| ७. श्री. दिनेश घरत | D Gharat | 9870306606 |
| ८. श्री. दयाळ भोईर | D Bhoir | 9821066107 |
| ९. श्री. निलेश घरत | Nilesh Gharat | 99690 3028 |
| १०. श्री. अनिल पाठारे | A Pathare | |

**मनोहरशेठ भोईर**
**विधानसभा सदस्य**
**मतदार संघ- उरण**

विधान सभा महाराष्ट्र

दिनांक - १७/११/२०१४

प्रति,
**मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस साहेब,**
**मुख्यमंत्री तथा पुनर्वसन मंत्री,**
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,
मुंबई

विषय- जेएनपीटी बंदरासाठी नविन शेवा व कोळीवाडा या गावांबाबत ...

महोदय,

माझ्या मतदार संघातील जेएनपीटी बंदरासाठी नविन शेवा व कोळीवाडा या गावांचे पुनर्वसन १९८७ साली केले त्यावेळेस घराच्या जोत्याखालची जमिन देण्यात आली होती. पुनर्वसन कायदयाप्रमाणे जागा देण्यात आली नसून तसेच नैसर्गिक वाढीपोटी गावाला वाढीव गावठाणसुध्दा देण्यात आलेले नाही. शासनाने नविन सेवा गावासाठी ३३.६४ हेक्टर जमिन संपादित केली होती. त्यांची सर्व रक्कम जेएनपीटीने शासनाकडे जमा केलेली आहे. त्यातील फक्त १०.४७ हेक्टर जमिन गावासाठी देण्यात आली होती. उर्वरित जमिन अद्यापही न देऊन प्रकल्पग्रस्तांची फसवणूक केली आहे.

सन १९८७ साली गावांची लोकसंख्या अंदाजे १५०० होती ती आता अंदाजे ३००० पेक्षा जास्त झाली आहे. तरी शासनाकडे पैसे भरलेली शिल्लक असलेली २३ हेक्टर जमिन नविन शेवा प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबत संबधित अधिका-यांना आदेश देण्यात यावेत, ही विनंती.

**आपला नम्र,**

**( मनोहरशेठ भोईर )**
**वि.स.स.**

२०



# परिशिष्ट - दोन
# (विभागाकडून प्राप्त झालेली माहिती)

नगर विकास विभाग

**विधानसभा विनंती अर्ज समिती समोरील साक्ष, दि.२०.१.२०१६**

---

**विषय** : जे.एन.पी.टी. ने नविन शेवा (ता.उरण, जि. रायगड) गावाच्या जमिनीकरीता सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत.

**पार्श्वभूमी :-**

- जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून एकूण २६१७ आर.हे. इतकी जमिन संपादित करण्यात आली होती. सदर प्रकल्पासाठी उरण तालुक्यातील १२ गावातील जमिन संपादित करण्यात आली असून त्यापैकी मूळ शेवा गावाचे गावठाण व लगत असणाऱ्या कोळीवाडा गावाचे गावठाण बाधित झाले होते. मूळ शेवा गावाचे पुर्नवसन मौजे बोकडविरा येथील गावठाणात नवीन शेवा येथे तर कोळीवाडा गावठाणाचे पुर्नवसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आले.
- सदर जागेचे संपादन सिडको / न्हावा-शेवा पोर्ट साठी झालेले असल्याने या प्रकरणी महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ च्या तरतूदी लागू होत नसल्याने त्या गावठाणांच्या पुर्नवसनांसाठी तत्कालीन पुर्नवसन मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.५.१९८६ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
- त्यानुसार नवीन शेवा गावठाणाच्या पुर्नवसनासाठी एकुण १५-७५-५ हे.आर. इतके क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. त्या क्षेत्रापैकी ४-९७-०१ हे.आर. क्षेत्र भूखंडासाठी वाटप करण्यात आले असून नागरी सुविधांसाठी ५-५१-४९ हे.आर. वापरण्यात आले आहे. तर ५-२७-० हे.आर. क्षेत्र वाटपासाठी शिल्लक आहे.

**प्रकल्पग्रस्तांची मागणी :-**

- नवीन शेवा गावाच्या पुर्नवसनासाठी ३३.६४.५ हे. आर. क्षेत्र ताब्यात घेतले असून सुध्दा केवळ १० हे.आर. जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन केले असून उर्वरित २३ हे. महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ नुसार देय असून त्याप्रमाणे भूखंड देण्यात यावेत अशी मागणी आहे. प्रकल्पग्रस्तांची सदरची मागणी ही संपादनासाठी करण्यात आलेल्या जमिनीच्या ताबा पावतीच्या अनुषंगाने आहे.

**सिडकोकडील कार्यवाही :-**

- नवीन शेवा गावाचे पुर्नवसन ज्या मौजे बोकडविरा येथील गावठाणात करण्यात आले आहे, त्या बोकडविरा गावातील संपूर्ण जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. त्या गावातील जमिनधारकांना १२.५% योजनेतंर्गत भूखंड वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
- नवीन शेवा गावठाणाच्या पुर्नवसनासाठी निश्चित करण्यात आलेल्या एकूण १५-७५-५ हे.आर. क्षेत्रापैकी शिल्लक ५-२७-० हे.आर. क्षेत्र भूखंडाच्या स्वरुपात प्रकल्पग्रस्तांना वाटप करता येईल. सद्यस्थितीत शिल्लक क्षेत्र सिडकोच्या ताब्यात आहे परंतु सदर क्षेत्राची होणारी रक्कम सिडकोला जे.एन.पी.टी. कडून प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच पुर्नवसन अनुषंगिक खर्च जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे देणे आवश्यक आहे.





नगर विकास विभाग

**विधानसभा विनंती अर्ज समिती समोरील साक्ष, दि.११.०५.२०१६**

---

**विषय** : जे.एन.पी.टी. ने नविन शेवा (ता.उरण, जि. रायगड) गावाच्या जमिनीकरीता सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत.

**पार्श्वभूमी :-**

- जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून एकूण २६१७ आर.हे. इतकी जमीन संपादित करण्यात आली होती. सदर प्रकल्पासाठी उरण तालुक्यातील १२ गावातील जमिन संपादित करण्यात आली असून त्यापैकी मूळ शेवा गावाचे गावठाण व लगत असणाऱ्या कोळीवाडा गावाचे गावठाण बाधित झाले होते. मूळ शेवा गावाचे पुर्नवसन मौजे बोकडविरा येथील गावठाणात नवीन शेवा येथे तर कोळीवाडा गावठाणाचे पुर्नवसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आले.
- सदर जागेचे संपादन सिडको / न्हावा-शेवा पोर्ट साठी झालेले असल्याने या प्रकरणी महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ च्या तरतूदी लागू होत नसल्याने त्या गावठाणांच्या पुर्नवसनांसाठी तत्कालीन पुर्नवसन मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.५.१९८६ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
- त्यानुसार नवीन शेवा गावठाणाच्या पुर्नवसनासाठी एकुण १५-७५-५ हे.आर. इतके क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. त्या क्षेत्रापैकी ४-९७-०१ हे.आर. क्षेत्र भूखंडासाठी वाटप करण्यात आले असून नागरी सुविधांसाठी ५-५१-४९ हे.आर. वापरण्यात आले आहे, तर ५-२७-० हे.आर. क्षेत्र वाटपासाठी शिल्लक आहे.

**प्रकल्पग्रस्तांची मागणी :-**

- नवीन शेवा गावाच्या पुर्नवसनासाठी ३३.६४.५ हे. आर. क्षेत्र ताब्यात घेतले असून सुध्दा केवळ १० हे.आर. जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन केले असून उर्वरित २३ हे. महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ नुसार देय असून त्याप्रमाणे भूखंड देण्यात यावेत अशी मागणी आहे. प्रकल्पग्रस्तांची सदरची मागणी ही संपादनासाठी करण्यात आलेल्या जमिनीच्या ताबा पावतीच्या अनुषंगाने आहे.

**शासनाकडून केलेली कार्यवाही :-**

- नवीन शेवा गावाच्या पुर्नवसनाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, विभागीय आयुक्त, कोकण, चेअरमन, जे.एन.पी.टी. व जिल्हाधिकारी, रायगड यांच्या समवेत दि.२.२.२०१६, दि.२४.२.२०१६ व दि.९.५.२०१६ रोजी मा. प्रधान सचिव (नवि-१) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील चर्चेनुसार नवीन शेवा गावाच्या पुर्नवसनासाठी संपादित करण्यात आलेल्या ३३.६४ हे.आर. क्षेत्राबाबतच्या अभिलेखाची तपासणी जिल्हाधिकारी, रायगड करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

*******

**नगर विकास विभाग / नवि-१०**

**विधानसभा विनंती अर्ज समिती समोरील साक्ष दि.२४.०५.२०१६**

---

**विषय** : जे.एन.पी.टी. ने नविन शेवा (ता.उरण, जि.रायगड) गावाच्या जमिनीकरीता सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत.

जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून एकूण २६९७ आर.हे. इतकी जमीन संपादित करण्यात आली होती. सदर प्रकल्पासाठी उरण तालुक्यातील १२ गावातील जमिन संपादित करण्यात आली असून त्यापैकी मूळ शेवा गावाचे गावठाण व लगत असणाऱ्या कोळीवाडा गावाचे गावठाण बाधित झाले होते. मूळ शेवा गावाचे पुर्नवसन मौजे बोकडविरा येथील गावठाणात नवीन शेवा येथे तर कोळीवाडा गावठाणाचे पुर्नवसन बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आले.

सदर जागेचे संपादन सिडको / न्हावा-शेवा पोर्टसाठी झालेले असल्याने या प्रकरणी महाराष्ट्र प्रकल्प विस्थापीत व्यक्तीचे पुर्नस्थापना कायदा, १९७६ च्या तरतूदी लागू होत नसल्याने त्या गावठाणांच्या पुर्नवसनांसाठी तत्कालीन पुर्नवसन मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.५.१९८६ रोजी आयोजित बैठकीत दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

**शासनाकडून केलेली कार्यवाही :-**

- नवीन शेवा गावाच्या पुर्नवसनाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, विभागीय आयुक्त, कोकण, चेअरमन जे.एन.पी.टी. व जिल्हाधिकारी, रायगड यांच्या समवेत दि.२.२.२०१६, दि.२४.२.२०१६ व दि.९.५.२०१६ रोजी मा. प्रधान सचिव (नवि-१) यांच्याकडे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ३३.६४ हे.आर. क्षेत्राबाबतच्या अभिलेखाची तपासणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून दि.१८.५.२०१६ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-
  1. मौजे बोकडवीरा ता.उरण येथील सर्व जमिनी ह्या नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत केल्याचे भूसंपादनातील कलम ४ ची अधिसूचना, कलम ६ चा जाहीरनामा व कलम ११ खालील निवाडे यावरुन आढळून येत आहे. तथापि, मौजे बोकडवीरा ता. उरण येथील सर्व्हे क्र. ११२ मधील ५-०१-३० हे.आर एवढी जमीन ही शेवा गावातील विस्थापीत होणाऱ्या कुटूंबांच्या पुर्नस्थापनेसाठी संपादित केली असल्याचे, भूसंपादन अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी विविध कार्यालयांशी केलेल्या पत्र व्यवहारावरुन निदर्शनास येत आहे. मौजे बोकडवीरा येथील केलेल्या सर्व जमिनींचा ताबा आहे, यावरुन निदर्शनास येत आहे. मौजे बोकडवीरा येथील संपादित केलेल्या सर्व जमिनीचा ताबा दि.२७.५.१९८५ रोजी सिडकोकडे हस्तांतरीत केल्याचे उपलब्ध ताबा पावतीवरुन दिसून येत आहे.
  2. सदर जमिनींच्या भूसंपादनासाठी मोबदला रक्कम व पुनर्वसनासाठी लागणारा सर्व निधी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून प्राप्त झाला आहे.

F:\New-note - Copy.docx





३. शेवा गावठाणातील ४६८ कुटुंबांना निकषाप्रमाणे भूखंड दिल्याचे आढळून आले आहे. यात मूळ गावठाणातील घरे ४० चौ.मी. पेक्षा कमी असली तरी सुध्दा कमीत कमी ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड नवीन गावठाणात दिलेला आहे व याप्रमाणे जुन्या गावठाणातील घरांच्या क्षेत्रफळानुसार जास्तीत जास्त २२३५ चौ.मी. चा भूखंड दिल्याचे आढळून येत आहे.

४.मुळ शेवा गावातून नवीन शेवा गावात पुर्नस्थापीत झालेल्या कुटुंबांमधील पात्र व्यक्तीला १.५ गुंठा भूखंड देण्याच्या अनुषंगाने उपलब्ध अभिलेखावरुन आढळून येते की, उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडील जाहीर दि.१७.१२.१९८५ अन्वये पात्र व्यक्तींना विहीत मुदतीत तहसिलदार उरण यांचेकडे जमीन मागणीचे अर्ज सादर करावयाचे होते. त्यानुसार २३९ व्यक्तींनी जमीन मागणीचे अर्ज विहित मुदतीत सादर केल्याचे आढळून येत आहे.

*******

उ-९

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**

हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२२६७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ Email ID rairehab@gmail.com ❖

क्रमांक: पुनर्वसन/पु-४/३५५५१९/२०१५ दिनांक :30/०९/२०१५

प्रति,

मा. अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

१
१/१०/२०१५

**विषय :- "जेएनपीटीने नविन शेवा (ता. उरण, जि. रायगड) गावाच्या जमिनीकरिता शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत" या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचा विनंती अर्ज.**

**संदर्भ :- मा. अवर सचिव यांचेकडील पत्र क्र. ३९२१६/म.वि.स./विसविअस/३ दिनांक २२/०९/२०१५.**

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, "जेएनपीटीने नविन शेवा (ता. उरण, जि. रायगड) गावाच्या जमिनीकरिता शासनाकडे सर्व रक्कम अदा केल्यानंतर देखील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नसल्याबाबत" या विषयावरील श्री. मनोहर भोईर वि.स.स यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

